क्रॉस मैदान (चर्चगेट बाजू) येथील क्षेत्र देखभाल व संरक्षणासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे हस्तांतरीत करणेबाबत.

महाराष्ट्र शासन

महसूल व वन विभाग

शासन ज्ञापन क्रमांक: -जमीन-२५१३/२६३/प्र.क्र.१००/ज-२

मंत्रालय मुख्य इमारत, पहिला मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई-४०० ०३२
दिनांक:- ०६ नोव्हेंबर, २०१७

<u>वाचा:-</u> शासन निर्णय, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभाग, क्रमांक सीआरएम १०८५/५४८९३/(२)/क्रीयुसे-२, दि.१४ ऑक्टोबर, १९८८

ज्ञापन:-

क्रॉस मैदान, चर्चगेट येथील २३,००० चौ.वार. जागा सर्कस व अन्य कारणांसाठी उपलब्ध करुन देण्याच्या संदर्भात मा. उच्च न्यायालयाच्या रिट याचिका क्र. ३९०/१९८७ मधील आदेशानुसार समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभागामार्फत संदर्भाधिन शासन निर्णय दि.१४.१०.१९८८ अन्वये नियमावली "रुल्स फॉर द अलॉटमेंट ऑफ प्लॉटस ऑन क्रॉस मैदान (एक्सक्ल्युडिंग होमगार्ड साईड) इन बॉम्बे, १९८८" तयार केलेली आहे. सदर नियमावलीच्या आधारे क्रॉस मैदानाचा भूखंड (चर्चगेट बाजू) प्रत्येक वर्षी उक्त नियमावलीतील नियम क्र.३ नुसार जागा वाटप करण्याच्या अनुषंगाने प्राधान्य देणेबाबत सुची तयार केलेली आहे. सदर नियमावलीतील नियम क्र.३ (vi) नुसार सर्कससाठीही जागा वाटप करण्याचे निदेश आहेत. नियम क्र.६ नुसार नियम ३ मध्ये नमूद केलेल्या बाबींसाठी दि.१५ ऑक्टोबर पासून ४५ दिवस व दि.१५ जानेवारीपासून ४५ दिवस इतक्या कालावधीसाठी मैदान उपलब्ध करुन देता येईल. क्रॉस मैदान (चर्चगेट बाजू) येथील क्षेत्र सद्य:स्थितीत जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांचे अखत्यारीत आहे. सदर मैदानाची उक्त नमूद जागा ओव्हल ट्रस्ट यांना देखभालीसाठी शासनाचे ज्ञापन क्र.एस-३०/०१/प्र.क.१०५/ज-२, दि.११.६.२००४ अन्वये पाच वर्षांच्या कालावधीसाठी देण्यात आलेली होती. सदर कालावधी संपुष्टात आलेला आहे. या पार्श्वभूमीवर सदर मैदान देखभाल व संरक्षणासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. त्यानुसार क्रॉस मैदान

(चर्चगेट बाजू) येथील २३,००० चौ.वार. क्षेत्र देखभाल व संरक्षणासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे खालील अटी व शर्तींवर हस्तांतरीत करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

अटी व शर्ती :-

१) सदर जागेवर काही अनधिकृत बांधकामे व इतर बाबी असतील त्या निष्कासित करुन सदर जागा जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांनी बृहन्मुंबई महानगरपालिकेस देखभाल, संरक्षण व व्यवस्थापनासाठी सुपूर्द करण्यात यावी.

२) रिट पिटिशन क्र.३९०/१९८७ मधील निर्णयानुसार "रुल्स फॉर द अलॉटमेंट ऑफ प्लॉटस ऑन क्रॉस मैदान (एक्सक्ल्युडिंग होमगार्ड साईड) इन बॉम्बे, १९८८" नुसार जागा वाटपाचे नियम प्रसिध्द केलेले आहेत. सदर नियमावली नुसार विहित केलेल्या कार्यपध्दतीचे काटेकोरपणे अनुपालन करुन सदर मैदानातील जागा वाणिज्यिक वापराकरीता वाटप करणेकरीता वृत्तपत्रामध्ये जाहिरात प्रसिध्द करुन आवेदन मागविण्याची कार्यवाही आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून करण्यात यावी. याकरिता जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांच्या संमतीची आवश्यकता असणार नाही.

३) सदर मैदानावर प्रथम हक्क राज्य शासनाच्या महसूल विभागाचा असेल. विभागास प्रस्तूत मैदानाची कोणत्याही कारणास्तव आवश्यकता भासल्यास बृहन्मुंबई महानगरपालिकेने सदर जागा विनाविलंब व प्राथम्याने शासनास विना अट उपलब्ध करुन देणे बृहन्मुंबई महानगरपालिकेवर बंधनकारक राहील. उक्त जागा वाटपाविषयी शासनाचे काही निर्देश असल्यास सदर निर्देश बृहन्मुंबई महानगरपालिकेवर बंधनकारक राहतील.

४) सदर मैदान बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे सुपूर्द केल्यानंतर त्याच्या व्यावसायिक वापरातून मिळणारे उत्पन्न बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे राहील. त्यामध्ये शासनाचा हिस्सा राहणार नाही. तसेच सदर जागेच्या संरक्षण व देखभालीसाठी होणारा खर्च व्यावसायिक प्रयोजनातून मिळणा-या उत्पन्नातून बृहन्मुंबई महानगरपालिकेने करावा.

५) जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांना आवश्यक वाटतील अशा अन्य सुसंगत अटी व शर्ती घालण्याची मुभा राहील. मात्र अशा अटी / शर्ती निर्धारीत करताना आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्याशी विचारविनिमय करणे अनिवार्य राहील.

६) सदर शासन ज्ञापन वित्त विभाग अनौपचारीक संदर्भ क्र.२४३/२०१७/व्यय-९, दि.२०.७.२०१७ अन्वये व त्यांच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

७) सदर शासन ज्ञापन महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक संकेतांक २०१७११०६१२२०४०२०१९ असा आहे. हे ज्ञापन डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Sunil Deoram Agarkar

Digitally signed by Sunil Deoram Agarkar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue And Forest Dept, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=bd05f4fdbbb9ed343f1be2caf44a80e981a9aaaa980ed10ed0e2772dfcca67cc, cn=Sunil Deoram Agarkar
Date: 2017.11.06 12:24:24 +05'30'

(सुनिल आगरकर)
कार्यासन अधिकारी

प्रति,

जिल्हाधिकारी, मुंबई शहर जिल्हा, जुने जकात घर, शहीद भगतसिंग मार्ग, फोर्ट, मुंबई - ०१

प्रतिलिपी,

१) अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
२) अपर मुख्य सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
३) प्रधान सचिव (नवि-१), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
४) आयुक्त, कोकण विभाग, कोकण प्रदेश, नवी मुंबई
५) कार्यकारी अभियंता, इलाखा शहर विभाग, बांधकाम भवन, दुसरा मजला, मुंबई-०१
६) प्रधान महालेखापाल (लेखा परीक्षा) मुंबई/ नागपूर
७) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/ नागपूर
८) संचालक लेखा व कोषागारे संचालनालय, मुंबई
९) संचालक, स्थानिक निधी लेखा, नवी मुंबई.
१०) निवडनस्ती, महसूल व वन विभाग, ज-२.